# वसुंधरात 'सायबर शिक्षा फॉर सुरक्षा उपक्रम प्रबोधन

सोलापूर | येथील वसुंधरा कला महाविद्यालयात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा कार्यक्रम राबविण्यात आला. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल, क्वीक हिल फाउंडेशन, पुणे, वसुंधरा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम झाला. यात संगणक शास्त्र संकुलातील राहुल शिंदे व मोहिनी दुधाळ यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यात एकूण १५० विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षीय आढावा महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख यांनी घेतला. उपप्राचार्य डॉ. अनुराधा क्षीरसागर, प्रा. मुल्ला ए.ए., प्रा. आसमा शेख, प्रा. मेघा ढाणके उपस्थित होते. सूत्रसंचलन योगेश शिंदे याने तर सायली उबाळे यांनी आभार मानले.